/ प रि प त्र क /

जा. क्र. डीपीआर/संकीर्ण/१२११८/क. १०[एनएचआरसी] पुणे-१ दि. २१/५/९९

विषय:- जिल्हादंडाधिकारी यांचे ताब्यांत असलेल्या तालुकास्तरावर असलेल्या सबजेलमध्ये मृत्यू पावलेल्या आरोपींचे अहवाल/ शवविच्छेदन अहवाल/ इन्क्वेस्ट पंचनामा इत्यादि कागदपत्रे आयोगास सादर करणेबाबत

---

आतापर्यन्त जिल्हास्तरावर असलेल्या जिल्हादंडाधिकारी यांचे अखत्यारीत काम करित असलेल्या दुय्यम कारागृहांमध्ये [सबजेलमध्ये ] मृत्यू पावलेल्या आरोपींचे सविस्तर अहवाल, शवविच्छेदन अहवाल, इन्क्वेस्ट पंचनामा इत्यादि कागदपत्रे राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना पाठवून त्याच्या प्रती या कार्यालयास पाठविण्यात येत होत्या. या संदर्भात या कार्यालयाचे इंग्रजी पृष्ठांकन क्र. डीपीआर/एनआयएससी/१९९५/१२/कक्ष-५ दिनांक ८/१/१९९६ ची प्रत जोडली आहे.

२. वास्तविक तालुका स्तरावर असलेल्या दुय्यम कारागृहांचे नियंत्रण हे जिल्हादंडाधिकारी हयांचेकडून होत असल्याने सदर दुय्यम कारागृह[सबजेल] प्रिझन ॲक्ट, १८९४ अन्वये तुरुंग म्हणून समजले जात नाही. तुरुंग खात्याची कारागृहे ही फक्त जिल्हास्तरावर स्थापन झालेल्या तुरुंगापुरतीच मर्यादित आहेत.

३. तरी सर्व जिल्हादंडाधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे अखत्यारीत असलेल्या तालुका स्तरावरील दुय्यम कारागृहांमध्ये मृत पावलेल्या आरोपींचे सर्व प्रकारचे अहवाल राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना परस्पर पाठवावेत व या संदर्भात या कार्यालयाशी होणारा पत्रव्यवहार दिनांक १.६.१९९९ पासून पूर्णपणे थांबवावा व त्याप्रमाणे सर्व दुय्यम कारागृहांना [सबजेलना] आपले कार्यालयाकडील परिपत्रामार्फत कळविण्यात यावे.

४. या कार्यालयाकडून राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना वरीलप्रमाणे कळविण्यात येत असून सदर प्रकरणी यापुढील सर्व प्रकारचा पत्रव्यवहार परस्पर संबंधित जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालयाशी करावा असे सुचविण्यात येत आहे हयाची कृपया नोंद घ्यावी.

टी. सिंगारवेल

[ टी. सिंगारवेल ] २१/५

अपर पोलीस महासंचालक व
कारागृह महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

९१३७

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
1 JUN 1999
शाखा गृह
प्र. लि. नि. उ. जि. निवासी अधिकारी

सर्व जिल्हादंडाधिकारी
रत्नागिरी

प्रत :- कारागृह उपमहानिरीक्षक पश्चिम विभाग, येरवडा पुणे-६/
कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद
कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर
कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई-८
यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित

प्रति अधिक्षक दुय्यम कारागृह (सर्व)